वाचले :१.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील दि. ०६/०८/२०१९ रोजीचे पत्र.

२.नागरवस्ती विकास योजना विभागाचे पत्र क्र. नाविया/९/कावि/१४८/१९,दि. ०९/१२/१९

३.मा. आयुक्त यांचेकडील दि१२/०१/२०२० रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र. भूजि/९/कावि/७५/२०१९-२०
दिनांक -१४/०१/२०२०

विषय : दिअंयो – राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
(DAY-NULM) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र (CLC)
जागा उपलब्ध करुन देणेबाबत...

आदेश,

वाचले क्र. १ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत दिअंयो – राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र (CLC) या उपक्रमासाठी लागणारी इमारत प्रथम तीन वर्षासाठी ULB व्दारा विनाशुल्क उपलब्ध झाल्यास शहरी उपजिविका केंद्र (CLC) स्वबळावर उभी राहण्यास मदत होईल. तीन वर्षानंतर संबंधित जागेचे नाममात्र भाडे CLC व्दारा ULB ला देण्यात येईल.

वाचले क्र. २ अन्वये सहा. आयुक्त, नागरवस्ती विकास विभाग यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत दिअंयो – राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिका क्षेत्राच्या मध्यवर्ती तसेच नागरिकांच्या सोयीच्या ठिकाणी शहरी उपजिविका केंद्र स्थापन करणेबाबत कळविलेले आहे.

सदरील शहरी उपजिविका केंद्र स्थापन करणेसाठी सर्वसाधारणपणे १००० चौ.फुट इतकी जागा शहराच्या मध्यवर्ती किंवा बाजारपेठ असणारे ठिकाणी असणे आवश्यक असल्याने पिंपरी भाजी मंडई येथे (गाळा क्र. १ ते १०- प्रत्येकी ९९.८३ चौ.फुट)१००० चौ. फुट इतकी जागा उपलब्ध करुन देण्यास विनंती केलेली आहे.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८ उपरोक्त वाचले क्र.१ ते ३ च्या अनुषंगाने पिंपरी भाजी मंडई येथे रिक्त असलेली जागा - दहा गाळे (गाळा क्र. १ ते १०, प्रत्येकी क्षेत्रफळ - ९९.८३ चौ.फुट) दिअंयो – राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र (CLC) या उपक्रमासाठी तीन वर्षासाठी विनाशुल्क उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति ,
सहा. आयुक्त,
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत : - संबंधित सर्व्हेअर
२/- मिळकतीचा ताबा देणेबाबत पुढील कार्यवाही तात्काळ करणेत यावी.